**मे. पियुष शुगर एन्ड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ३८/२, वाळकी, पोस्ट देऊळगाव सिध्दी, तालुका आणि जिल्हा. अहमदनगर (४१४ ००६), महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित सी/बी हेवी मोलॅसिस / ऊसाचा रस / सिरप वर आधारीत ६०.० किलोलिटर प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत -**

पर्यावरण विषयक जनसुनावणी सुरु करण्यापूर्वी श्री संदिप निचित, अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जनसुनावणी काही महत्वाच्या कार्यालयीन कामकाजामुळे वेळेवर सुरु करता आली नाही म्हणून दिलगिरी व्यक्त केली.

मे. पियुष शुगर एन्ड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ३८/२, वाळकी, पोस्ट – देऊळगाव सिध्दी, तालुका आणि जिल्हा – अहमदनगर (४१४ ००६), महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित सी / बी हेवी मोलॅसिस / ऊसाचा रस / सिरप वर आधारीत ६०.० किलोलिटर प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार कार्यालयीन आदेश क्रं. ई- १२६, पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २११२२८-एफटीएस-०९९ दिनांक २८-१२-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हा दंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>मुंबई चे प्रतिनिधी<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर | - | **आयोजक** |

श्री संजीव अ. रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदर जनसुनावणीस उशीर झाल्यामुळे दिलगिरी व्यक्त केली.

श्री संजीव अ. रेदासनी, आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदीप निचित, अपर जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. प्रवीण जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ आणि ओमिक्रॉन संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त ४० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली. आयोजक यांनी जनसुनावणीचे महत्व व प्रक्रिया याबाबतची माहिती दिली व याबाबत मंडळाकडे १४ निवेदने प्राप्त झाले आहेत असे सांगितले.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पा विषयी माहिती व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात निर्माण होणा-या सांडपाण्यावर सी.पी.यु. मध्ये प्रक्रिया केली जाईल आणि त्याचा पुनर्वापर केला जाईल. तसेच आसवणी प्रकल्पातून निघणारे सांडपाणी/स्पेंट वॉश वर बायोमिथिनेशन, एम.ई.ई. कॉनसन्ट्रेशन व कंपोस्टमध्ये प्रक्रिया केले जाईल व सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज/ शून्य द्रव निःस्सारण असेल. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च हा रु. ५२० लाख असेल तर प्रक्रिया व देखभाल साठी रु. २७० लाख प्रतिवर्षे खर्च असेल. त्याचप्रमाणे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदार निधी/Corporate Environment Responsibility Fund (CER) Fund हा रु. ६८ लाख एवढा नियमांनुसार करण्यात येईल.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

**<u>सदर सुनावणीमध्ये खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित झाले आहेत :-</u>**

१) **<u>श्री लक्ष्मण गंगाधर बोठे, राहणार - देऊळगाव सिध्दी, तालुका व जिल्हा-अहमदनगरः-</u>**

श्री. बोठे यांनी सांगितले की, प्रस्तावित ६०.० केएलपीडी आसवणी प्रकल्प स्थापनेसाठी आपण १०.० कि.मी. अंतराच्या पर्यावरणाची सद्यस्थितीचे सादरीकरण केलेले आहे. ते सर्व आपण नियमात बसवून आपल्या सोयीनुसार तयार केलेले आहे. मात्र वस्तूस्थिती अशी आहे की येथून १ ते १.५ कि.मी. अंतरावर विंधन विहिरी म्हणजे बोअर वेल्स आहेत. स्थानिक शेतक-यांच्या विहिरीमध्ये केमिकलचे पाणी येते. ते पाणी आम्हाला पिता येत नाही. शेतीसाठी रानात आल्यावर आम्हांला दुसरे पाणी नाही. जाणूनबूजून आम्हांला तेच पाणी प्यावे लागते. तरी ही जनसुनावणी पुढे ढकलून आम्हांला कालावधी देण्यात यावा. आम्ही पाण्याचे नमुने देतो व ते योग्य आल्यास त्याला आमची हरकत नाही.

२) **<u>श्री विकास राजेन्द्र इंगळे, राहणार-देऊळगाव सिध्दी, तालुका व जिल्हा-अहमदनगरः-</u>**

श्री. इंगळे यांनी सांगितले की, आपण सर्वेक्षण करताना १० कि.मी. परिघातील पाण्याचे नमुने घेतले, ते स्थानिक प्रशासनाला विचारुन घेतले का? त्यावेळी स्थानिक प्रशासन व आपले कोणते अधिकारी सोबत होते याचा काहीही उल्लेख नाही. श्री विकास इंगळे यांनी आक्षेप नोंदविला की सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल आपण स्थानिक शेतक-यांना दाखविलेला नाही.

**आयोजक**, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की १० कि.मी. परिघातील सर्व दहा ग्रामपंचायत कार्यालयात ईआयए अहवाल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, ते आजही आपण अभ्यासू शकतात.

**श्री विकास इंगळे** यांनी आक्षेप नोंदविला की, प्रकल्पा पासून १०० मीटर अंतरावर येथे आलेल्या शेतक-यांच्या विहीरी आहेत. त्या आपण तपासून घ्याव्यात. आपणास येथील सद्यस्थिती दिसेल. येथील स्थानिक शेतकरी ज्यांची शेती प्रकल्पाशेजारी आहे, ती आपण विचारात घ्यावी. अहवालात शिराढोण गावाचा उल्लेख आहे, ते प्रकल्पापासून १५ कि.मी. अंतरावर आहे, वाटेफळ गाव १५ कि.मी. आहे व देऊळगाव येथून २ कि.मी. अंतरावर आहे. अहवालात असे दिलेले आहे की प्रकल्पा पासून दोन कि.मी. पर्यंत परिसरात काहीच नाही. येथून हाकेच्या अंतरावर काळोखेवस्ती आहे, त्याचा अहवालात उल्लेख नाही. त्याचप्रमाणे आपल्या प्रकल्पात इथेनॉल टाकी आहे, त्याचा स्फोट झाला तर १.२ कि.मी. अंतरापर्यंत त्याचा आघात होणार आहे. याबाबत आपण स्थानिक रहिवाशांना माहिती दिली आहे काय? स्थानिकांना विश्वासात न घेता सदरहू तांत्रिक अहवाल तयार करण्यात आलेला आहे. पाण्याचे नमुने गोळा करताना स्थानिक शेतक-याला न विचारता गोळा करण्यात आलेले आहे.

**श्री विकास इंगळे** यांनी मागणी केली की पाण्याचे नमुने गोळा करताना स्थानीक शेतक-यास बोलविण्यात यावे, पंच म्हणून आपणास ज्यांच्यावर विश्वास असेल, त्यांना बोलविण्यात यावे, स्थानिक प्रशासनातील व्यक्तीस बोलविण्यात यावे. ज्याच्या शेतातून मातीचा नमुना गोळा केला, त्या शेतक-यास तुम्ही येथे उभे करू शकाल काय? मातीचे नमुने घेतले त्या गट नंबर विषयी अहवालात माहिती नाही. त्यांनी पुढे सांगितले की १० कि.मी. अंतराच्या बाहेरिल आपण हवा गुणवत्ता सर्वेक्षण केलेले आहे. येथे वर्षभर पश्चिमेकडून पूर्वेकडे वारे वाहतात. जर हिवरे झारे गावात आपण पश्चिमेकडे जाऊन हवेचा नमुना घेतल्यास तेथे निष्कर्ष ही सरासरीच (Normal) येणार.सर्वेक्षणाचा कालावधी हा मार्च २०२१ ते मे २०२१ असा घेण्यात आला. आपण आपली

साखर कंपनी कार्यान्वित असताना जल, हवा, माती यांचे परिसरातील नमुने घेतले आहे काय हे दाखवून द्यावे. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की येथून २००-३०० मीटर्स अंतरावर दोन डाळिंबाच्या फळबागा आहेत. तेथील सद्यस्थिती तपासून पहावी, येथे ते शेतकरी उपस्थित आहेत, त्यांना रोज सकाळी शेतात जाऊन पाण्याने झाडे धुवावी लागतात. तर डाळिंब फळाची गुणवत्ता कशी राहिल? म्हणजे त्या शेतक-याने रु. ४-५लाख खर्च वर्षभर करायचा आणि तीन महिने चालणा-या या खाजगी कारखान्याने स्वतःच्या फायद्यासाठी स्थानिक शेतक-यांच्या पीकांची राख करायची. ग्रामपंचायतीस केलेला अर्ज आम्ही जिल्हाधिकारी यांना सादर करणार आहोत. श्री विकास इंगळे यांनी नमुद केले की आपण सद्यस्थितीचे नमुने संबंधित शेतक-यासमोर व पंचाच्या साक्षीने गोळा करावेत.

**सदस्य**, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना विचारले की आपण ज्या ज्या गावांचा अभ्यास केलेला आहे, त्याची माहिती सांगावी. सदस्य यांनी देऊळगाव सिध्दी हे जवळचे गाव आहे काय अशी विचारणा केली. तेथील नमुने घेतले आहेत काय याची माहिती द्यावी. सदस्य यांनी मत मांडले की उपस्थितांनी घेतलेले आक्षेप रास्त असून पर्यावरण सल्लागार यांना माहिती द्यावी.

**पर्यावरण सल्लागार** यांनी हिवरे झरे गाव, आंबेवाडी, खडकी गाव, गंगासाठी गाव, घेगेवस्ती, श्रीकृष्णवाडी आणि क्रिस्ट चर्च वाळकी येथे नमुने घेतल्याचे सांगितले.

**सदस्य**, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी देऊळगाव सिध्दिचे नमुने घेतले आहेत काय याबाबत विचारणा केली. सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या विंधन विहिरींची यादी कारखाना प्रशासन, ग्रामपंचायत सदस्यांना देण्याची सूचना केली आणि पर्यावरण सल्लागार यांना त्यांच्या विंधन विहिरींच्या नमुन्यांचे परिक्षण व अहवाल देण्याची सूचना केली. सदस्य यांनी बैठकीत मत मांडले की सदरहू ईआयए हा प्रारुप असून आपण उपस्थित केलेल्या सूचनांचा अंतिम ईआयए अहवालात समावेश करण्यात येईल असे सांगितले. जनसुनावणी ही प्रक्रिया असून ती पूर्णपणे पारदर्शक आहे.

**आयोजक**, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की सदरहू ईआयए हा कच्चा अहवाल असून आपले प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे मत, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठीच सदरहू जनसुनावणी आहे. आपल्या सूचनांची दखल घेऊनच प्रकल्प प्रवर्तक त्याप्रमाणे काम करतील व नंतरच अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन (फायनल ईआयए) अहवाल तयार करण्यात येऊन तो शासनास सादर करण्यात येईल. आपण बैठकीत उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांचा विचार करुनच शासन निर्णय घेईल.

**श्री विकास इंगळे** यांनी मत मांडले की सदरहू कारखाना हा खाजगी असून त्यांनी औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारलेला आहे. साखर कारखाना ५-६ महिनेच चालतो, तरीही त्याचें सांडपाणी खालच्या बाजूच्या शेतात येते. त्यावरुन त्यांच्या औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र किती कार्यक्षम आहे हे कळून येते.

**सदस्य,** पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदरहू जनसुनावणी ही प्रस्तावित आसवणी प्रकल्पाची असल्याने त्याबाबत बोलण्याची सूचना केली.

**श्री विकास इंगळे** यांनी मत मांडले की जर कार्यरत प्रकल्पाची अशी अवस्था आहे, स्थानिकांना त्याचा त्रास आहे, तर त्याबद्दल बोलणे गरजेचे आहे. त्यांनी अजून नवीन प्रकल्प सुरु केल्यावर काय होईल अशी भिती स्थानिक शेतक-यांना आहे असे सांगितले. जर साखर कारखाना ५-६ महिनेच चालतो, तरीही त्याचें सांडपाणी एक ते दीड कि.मी. खालच्या बाजूच्या शेतात १२ महिने येत असते, यावरुन कंपनीच्या ईटीपीच्या कार्य क्षमतेची कल्पना येते. कार्यरत प्रकल्पामुळे परिसरातील स्थानिकांना त्रास होत आहे, तर नवीन आसवणी प्रकल्पामुळे त्यात अजून भर पडेल. येथील खालच्या बाजूस असलेल्या वस्तींना गावातून पाणी आणावे लागते. आज जनसुनावणी आहे, म्हणून कंपनीने पाणी मारले. त्यांच्या कार्यरत प्रकल्पामुळे आमचे पाणी बंद केले, तर दुस-या नवीन प्रकल्पास मान्यता का द्यावी, आम्ही आमची शेती बंद करायची काय? या आमच्या हरकती आहेत.

३) **<u>श्री नवनाथ गंगाराम इंगळे, राहणार-देऊळगाव सिध्दी, तालुका व जिल्हा-अहमदनगरः-</u>**

श्री इंगळे यांनी नमुद केले की, माझी डाळिंबाची बाग प्रकल्पाच्या एक कि.मी. अंतरावर खाली आहे. १२०० झाडे आहेत. प्रकल्पाच्या बॉयलरमधून राखेची जी धुळ उडते, ती माझ्या बागेत रोज येते. ती रोज स्प्रे मारुन धुऊन काढावी लागते. झाडांची पाने ही झाडांचे नाक असते, ते जर बंद झाले तर झाड जगेल काय ? विहिरीचे पाणीही खराब झालेले आहे, तरी याबाबत व्यवस्था करुन द्या.

४) **<u>श्री साहेबराव बबन इंगळे, राहणार-देऊळगाव सिध्दी, तालुका व जिल्हा-अहमदनगरः-</u>**

श्री इंगळे यांनी सांगितले की, माझी या प्रकल्पाला लागूनच शेती आहे. माझ्या बांधावरच प्रकल्पाचे कंपाऊंड असून जवळजवळ ३०० मीटरवर आमची शेती आहे. माझ्या शेतातील पीकांवर प्रकल्पातील राख, धुळ पडते. विहिरीच्या पाण्याबाबत सांगायचे म्हणजे आम्ही गावातून

पाणी आणतो. आम्ही आतापर्यंत काहीही तक्रार केली नाही, कारण आम्हांला कळत नव्हते. आता कळल्यावर आम्ही सूचना नोंदविली आहे.

५) **<u>श्री भीमाजी मोहन घोडके, राहणार-देऊळगाव सिध्दी, तालुका व जिल्हा-अहमदनगरः-</u>**

श्री घोडके यांनी नमुद केले की, येथे माझी व माझ्या भावाची साडेतीन एकर शेती आहे. या कारखान्यातील घाण पाणी माझ्या शेतामधून वाहते, त्यामुळे गेले दहा वर्षे आम्हांला पीक येत नाही. पूर्वीच्या कारखान्यामुळे आम्हांला त्रास होतो आणि आता नवीन कारखाना आणत आहात, तर ते थांबवा, अशी आमची कळकळीची विनंती आहे. पहिल्या प्रकल्पा पासून होणारे प्रदूषण, धुराड्यातून बाहेर पडणारी राख शेतात संपूर्ण पीकांवर पडते. जर माणूस शेतातून गेला, तर संपूर्ण कपडे काळे होतात. जर आमच्या शेताची काळजी घेता येत नाही तर हा कारखाना बंद करा असे आमचे स्पष्ट म्हणणे आहे. या प्रकल्पाला माझा विरोध आहे.

६) **<u>श्री श्रीकृष्ण रामदास खराळ, राहणार-देऊळगाव सिध्दी, तालुका व जिल्हा-अहमदनगरः-</u>**

श्री खराळ यांनी सांगितले की, माझी येथून ३०० मीटरवर शेती आहे. आपण येथे मुद्दा उपस्थित केला की, येथे नदी नाही व नदीचे कुठलेही उगमस्थान नाही. माझ्या शेतापासून २०० मीटर अंतरावर पाझर तलाव आहे, त्यासाठी एक लेंढी ओढा आहे, हे कारखानास्थळ आहे व येथून त्याचे उगमस्थान आहे. कारखान्याने ८० फुटांची विहिर खोदली आहे, त्यामुळे परिसरातील सगळ्या विंधन विहिरी, विहिरीचे पाणी दूषित झालेले आहे, ते पाणी पिकाला दिल्याने आमच्या जमिनी नापीक झालेल्या आहेत. या परिसरात हरिणे व ससे आहेत. याबाबत आपल्या उपाययोजना, आपण किती लोकांना नुकसानभरपाई दिली, आपण किती लोकांचे व कुठल्या गट नंबरमधून पाण्याचे नमुने गोळा केले हे तरी आम्हांला माहित व्हायलाच पाहिजे. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की, प्रशासन व ग्रामसभा आपणास प्रकल्प उभारण्याच्या सूचना करत आहे मात्र या प्रकल्पास मान्यतेचा ठराव ग्रामसभेत मांडलेला नाही, तरीही प्रकल्पासाठी जनसुनावणी कशी आयोजित करण्यात आली? ही शेतक-याची तळमळ आहे. आपण म्हणता प्रकल्पाच्या ३.४१ किलो मीटरमध्ये मानवी वस्ती नाही, येथे प्रकल्पाच्या १०० मीटर हाकेच्या अंतरावर लोक राहत आहेत, त्यांची नांवे मतदार यादीत आहेत, ते काही विस्थापित नाहित, ते काही ऊसतोड कामगार नाहीत. पिढ्यानपिढ्या ते लोक तेथे राहत आहेत.

**श्री श्रीकृष्ण खराळ** यांनी आक्षेप नोंदविला की आपल्या हवेच्या प्रदूषणामुळे जे कांदा व फळबागा वर दुष्परिणाम न होण्यासाठी काय उपाययोजना केलेली आहे? सादरी करणात

सांगितले की पर्यावरणासाठी व विकासासाठी निधी उपलब्ध करु, तर आजपर्यंत कारखान्याने काय केले ते सांगावे. कारखान्याची ग्रामपंचायत कर व इतर बाकी असताना त्यांचे विकासाचा निधी राखीव ठेवण्याच्या आश्वासनावर विश्वास ठेवता येत नाही. प्रस्तावित प्रकल्पासाठी पाणी कसे उपलब्ध करण्यात येणार आहे याची माहिती द्यावी कारण आज आम्ही दुष्काळी पट्ट्यात येतो. सादरीकरणात सांगितले की परिसरातील ऊस कारखान्यासाठी लागेल, तर परिसरात किती हेक्टर क्षेत्र ऊसाचे आहे? तसेच किती स्थानिक लोकांना नोक-या दिलेल्या आहेत?, या प्रकल्प व्यवस्थापनाकडून कुठल्याही गोष्टींची अपेक्षा नाही, हे येथील रस्ता बंद करतात.

**श्री श्रीकृष्ण खराळ** यांनी सांगितले की येथील शेतक-यांच्या विहिरांच्या पाण्याचे नमुने गोळा करण्यात यावे. त्यावर स्थानिक प्रशासनातील सक्षम अधिकारी, संबधित शेतकरी व नागरिक यांच्या स्वतःच्या सह्या असाव्यात. प्रशासन असे सांगते की तीस दिवस आगाऊ सर्व ग्रामपंचायत कार्यालयात पर्यावरण अहवाल उपलब्ध करण्यात आला, तर किती ग्रामपंचायतींनी तो स्थानिकांना दाखविला?, त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणीची सूचना ही तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आली, तर आमच्या गावात एस.टी. संपामुळे वर्तमान पत्र मिळत नाही, तरी आम्हांला न्याय द्यावा प्रकल्प प्रवर्तकांची मनमानी थांबवून पर्यावरणाचा -हास थांबवावा, ही विनंती.

७) **श्री सुभाष बबन कराळे, राहणार-देऊळगाव सिध्दी, तालुका व जिल्हा-अहमदनगरः-**

श्री कराळे यांनी नमुद केले की, या साखर कारखान्यासाठी देऊळगाव सिद्दी गावाने २५० एकर क्षेत्र दिलेले आहे, एवढे मोठे क्षेत्र देऊनही या प्रकल्पात येथील स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात येत नाही. आम्ही आमचे क्षेत्र गट नं. ५४ आणि गट नं ५५ या कारखान्यासाठी दिलेला होता. या कारखान्याच्या मालकांनी झाडे लावलेली आहेत, हा गट त्यांनी घेतलेला नाही, त्याबाबत आमची हरकत आहे. मला शेती नाही, मी माळरानावर शेती करत आहे. तरी मला माझी शेती वारसा हक्काने परत मिळावी, ही माझी विनंती आहे. या प्रकल्पास माझा विरोध आहे.

**आयोजक**, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक मते, सूचना वा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की स्थानिक उपस्थितांनी त्यांच्या अडचणी आणि पर्यावरण विषयक समस्या अत्यंत चांगल्या पध्दतीने मांडल्या. त्यांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. ते सर्व मुद्दे जसेच्या तसे बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येऊन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाला सोबत केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

**अध्यक्ष,** पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की पियुष शुगर एण्ड पॉवर प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रस्तावित नवीन ६०.० केएलपीडी आसवणी प्रकल्प स्थापनेच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीसाठी आयोजित केलेली आहे. प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापन योजनेचे सादरीकरण केलेले आहे. बैठकीत उल्लेख केल्याप्रमाणे हा प्रारुप अहवाल आहे. या अहवालातील काही त्रुटी आपण निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. स्थानिकांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्याची नोंद घेण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर कारखाना व्यवस्थापन आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीचा अध्यक्ष या नात्याने काही सूचना देतो. त्याची नोंद घेण्यात यावी –

१) या नवीन आसवणी प्रकल्पाच्या स्थापनेची माहिती सर्व ग्रामपंचायत कार्यालयात तसेच कारखाना स्थळावर प्रवेशव्दाराजवळ, लोकांची ये-जा असणा-या ठिकाणी मराठीत प्रसिध्द करण्यात यावी व सदर प्रकल्पा विषयी स्थानिकांकडून प्राप्त होणा-या सूचना, आक्षेप या अजून आठ दिवस स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयाने स्विकाराव्यात. गावात सहजपणे वर्तमानपत्र मिळत नाहीत. तरी सर्व ग्रामपंचायत कार्यालयात सदरहू अहवाल दर्शनी भागावर लावावा.

२) कारखाना व्यवस्थापनाने साखर उत्पादन विभागातील प्रदूषणाची जी मानके आहेत उदा. जल, वायू, माती प्रदूषण आणि याची सद्यस्थिती व प्रदूषणाची पातळी याबाबत अहवाल सादर करण्यात यावा.

३) प्रदूषणाचा आघात/परिणाम हा प्रकल्प परिसराजवळ जास्त असणार आहे, तरी देऊळगाव सिध्दी, लगतची गावे, जवळील बाग, विहिरी, विंधन विहिरी, पाणी पुरवठ्याची साधने येथील नव्याने नमुने घेण्यात यावे. ज्या व्यक्तीच्या विहिरीचे नमुने गोळा करण्यात येतील त्यांच्या समक्ष नमुने गोळा करण्यात यावे. गावातील प्रतिष्ठित नागरिक, पोलिस पाटील, सोसायटीचे अध्यक्ष, लोकप्रतिनिधी यांच्यासमोर नमुने नव्याने घेण्यात यावेत. त्या नमुन्यांचे अहवाल त्या त्या गावात प्रसिध्द करण्यात यावेत.

४) स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयाने तालुका कृषि अधिकारी यांचेकडुन पिक नुकसानीबाबत अहवाल मागवावा.

**सदस्य**, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की स्थानिकांनी अतिशय चांगले मुद्दे मांडले. स्थानिकांना त्रास होत आहे म्हणूनच त्यांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. सदस्य यांनी कारखाना व्यवस्थापनाला सूचना केली की जर आपणास प्रकल्प कार्यन्वित करायचा असेल, तर आपणास स्थानिकांचे सहकार्य घेणे आवश्यक आहे, स्थानीकांना रोजगाराची संधि द्यायला हवी. ती मागणी रास्त आहे. त्यांनी पर्यावरण सल्लागार यांना सूचना केली की आक्षेप उपस्थित करणा-या स्थानिक व्यक्तींकडून यादी घेऊन त्यांच्या विहिरी, विंधन विहिरी यांचे पाण्याचे नमुने घेण्यात यावे. त्याचे अहवाल तयार करण्यात यावे. कारखान्याने जो OCMS लावला आहे, त्याचा अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा.

**अध्यक्ष**, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सर्व मुद्दे घेण्यात आले असून सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात यावी. अध्यक्ष यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी सीएसआर निधी हा जास्तीत जास्त ज्या गावात प्रकल्प आहे, त्या गावात सामाजिक विकास कामांसाठी खर्च करण्यात यावा. तो खर्च करताना जी स्थानिक संस्था आहे म्हणजे ग्रामपंचायतला विश्वासात घेण्यात यावे. त्यांची गरज लक्षात घ्या अशी अपेक्षा आहे की पाणी व जलसंधारण या क्षेत्रातील कामास प्राधान्य देण्यात यावे. त्याच प्रमाणे रोजगाराबाबतही ज्या गावात प्रकल्प आहे त्या गावातील लोकांना, स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. कोणत्याही भागाचा विकास होण्यासाठी शेतीबरोबरच शेतीला पुरक उद्योग हे विकसित होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्राचा व महाराष्ट्राचा इतर भागांचा विचार करावा, आपल्याला लगेच वेगळेपण दिसून येईल. शेतक-याला चार पैसे मिळतील जेव्हा त्याच्या उत्पादनावर प्रक्रिया करणारा एखादा उद्योग येईल. विरोधी मुद्दे व आक्षेप नोंदविलेच पाहिजेत पण या कारखान्यामुळे स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला भाव मिळणार आहे. येथे साखर कारखान्याबरोबरच आसवणी प्रकल्प येणार आहे. आसवणी प्रकल्प नफ्यात आला तर एफआरपीपेक्षा जास्त भाव स्थानिक शेतक-यांना मिळणार आहे. कारखाना नफ्यात चालला तर स्थानीकां बरोबर परिसरालाही त्याचा फायदा होईल. साखर उत्पादना बरोबरच आसवणी व पुढे सहविद्युत प्रकल्प येईल त्यामुळे चार पैसे शेतक-यांच्या पदरात पडतील.

**अध्यक्ष**, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याची इतिवृतात नोंद घेण्यात येईल.

**आयोजक** यांनी सर्वांचे आभार मानून माननीय अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषीत केले.

**(संजीव अ. रेदासनी)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ ,अहमदनगर

**(डॉ. प्रवीण एम. जोशी)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ ,नाशिक

**(संदीप निचित)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर